Mahindra Lifespace Developers Limited
Mahindra Towers, 4A,
Dr. G. M. Bhosale Marg, Worli,
Mumbai - 400 018, India
+91 22 6747 8600
Email: investor.mldl@mahindra.com
www.mahindralifespaces.com
CIN: L45200MH1999PLC118949

March 19, 2026

| **BSE Limited**<br>Corporate Services,<br>Piroze Jeejeebhoy Towers,<br>Dalal Street, Mumbai – 400 001 | **National Stock Exchange of India Limited**<br>Exchange Plaza,<br>Bandra Kurla Complex,<br>Bandra (East), Mumbai 400051 |
|---|---|

Re:

| Security | BSE | NSE | ISIN |
|---|---|---|---|
| Equity Shares | 532313 | MAHLIFE | INE813A01018 |

**Sub: Newspaper Publication regarding Special Window for re-lodgement of Transfer of Physical Shares**

Dear Sir/Ma'am,

Please find enclosed copies of the newspaper advertisements published today (i.e. 19th March 2026) in the Newspapers (including e-Newspapers) viz. Business Standard (in English) and Sakal (in Marathi), Mumbai editions, inter alia informing about the opening of Special Window period for Re-lodgement of Transfer of Physical Shares.

This intimation is also being uploaded on Company's website at https://www.mahindralifespaces.com/.

Kindly take the above on record.

**Yours faithfully,**
**For Mahindra Lifespace Developers Limited**

BIJAL BHARAT PARMAR
Digitally signed by BIJAL BHARAT PARMAR
Date: 2026.03.19 13:59:57 +05'30'

**Bijal Parmar,**
**Company Secretary & Compliance Officer**

*Enclosure.: As above*

## भारतासमोर बलाढ्य चीनचे आव्हान

नवी दिल्ली : डेन्मार्कमधील हॉरसेन्स येथे २४ एप्रिल ते ३ मे या कालावधीत होत असलेल्या थॉमस व उबेर बॅडमिंटन करंडकासाठी गटवारी जाहीर करण्यात आली. पुरुष व महिला अशा दोन्ही गटांमध्ये भारतीय संघासमोर बलाढ्य तसेच गतविजेता चीनचेच आव्हान असणार आहे. वैयक्तिक खेळाडूंच्या क्रमवारीनुसार भारताच्या दोन्ही संघांना (पुरुष व महिला) आठवे मानांकन देण्यात आले आहे.

# चीतपट कुस्तीने दिवस गाजला

## महाराष्ट्र केसरी स्पर्धेला दिमाखात सुरुवात

वाघोली (अजितदादा पवार क्रीडा नगरी) ता. १८ : महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघातर्फे अयोजित महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व महाराष्ट्र केसरी किताब कुस्ती स्पर्धेला बुधवारी सायंकाळी स्व. अजितदादा पवार क्रीडानगरी (वाघोली, पुणे) येथे उत्साहात सुरुवात झाली. पहिलाच दिवस चीतपट कुस्तीने गाजला. महाराष्ट्र केसरी गटातील कुस्त्या उशीर झाल्याने उद्या (गुरुवारी) होणार आहेत.

बुधवारी सायंकाळी पहिल्या दिवशी माती व गादी विभागातील ५७, ८६ व महाराष्ट्र केसरी गटाच्या लढतींना मोठ्या दिमाखात सुरुवात झाली. यावर्षीपासून पहिल्यांदाच महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या इतिहासात प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र केसरी गटाच्या लढतींना पहिल्या दिवशीच सुरुवात झाल्याने या गटाच्या लढतींकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या. तसेच पहिल्याच दिवशी मैदान कुस्ती शौकीनांनी खचाखच भरले. यावर्षी अनेक नामवंत मल्लांनी या स्पर्धेत वाइल्ड कार्डच्या माध्यमातून विविध जिल्ह्यांचे प्रतिनिधित्व केले असल्याने स्पर्धेत रंगत वाढली आहे. उद्घाटनाच्या दिवशी झालेल्या माती विभागातील ५७ किलो वजनी गटात मुंबईच्या लकी खरात याने नागपूरच्या तेजस खराबेचा, कल्याणच्या सोहन लोखंडे याने चंद्रपूरच्या अदित्य मगरुळकरचा, सोलापूरच्या किशोर पवारने अमरावतीच्या मोहम्मद शेखचा, सोलापूर जिल्ह्याच्या अजय निंबाळकर याने यवतमाळच्या कृष्णा आबळेचा व सोलापूर शहराच्या स्वप्नील जाधव याने हिंगोलीच्या अनिल पोळचा १०-० अशा गुणाधिक्याने एकतर्फी पराभव करत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.


वाघोली : माती विभागातील ५७ किलो वजनी गटातील लढतीतील चुरशीचा क्षण.

### नावलौकिक मिळवून द्यावा!

मल्लांनी कुस्तीकडे खेळ म्हणून पाहावे. मल्लांनी ऑलिंपिकमध्ये पदक मिळवून या खेळाला नावलौकिक मिळवून द्यावा. स्व. अजितदादा पवार यांनी नेहमीच कुस्तीला प्रोत्साहन दिले. त्यांचे स्वप्न पूर्ण करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बुधवारी केले. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन सुनेत्रा पवार यांच्या हस्ते झाले. सुनेत्रा पवार पुढे म्हणाल्या, सरकार कुस्तीला नेहमी प्रोत्साहन देत आले आहे. स्व. अजितदादा पवार यांनी कुस्ती उच्च स्थानावर असावी, असे स्वप्न पाहिले होते. त्यासाठी ते सतत प्रोत्साहन देत होते. त्यांचे हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मल्लांनी प्रयत्न करावे.

## महापौर चषकासाठी पाच कोटींचा निधी

मुंबई, ता. १८ : गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला मुंबईकर खेळाडूंसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी महापौर चषकासाठी ७५ लाखांऐवजी पाच कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे मुंबईतील क्रीडा क्षेत्रात आनंदाचे अन् उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मुंबई महापालिका मुख्यालयात महापौर रितू तावडे यांच्या अध्यक्षतेखाली क्रीडा संघटकांची महत्त्वपूर्ण बैठक बुधवारी (ता. १८) पार पडली. या वेळी महापौर चषक ही स्पर्धा तातडीने पुन्हा सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली. आयोजनास झालेल्या विलंबामुळे स्पर्धा पूर्ण करण्यासाठी तब्बल चार महिन्यांचा कालावधी देण्यात येणार आहे.

# ईशान किशनकडे हैदराबादचे नेतृत्व

हैदराबाद, ता. १८ (पीटीआय) : पुढील शनिवारपासून सुरू होणाऱ्या आयपीएलच्या सुरुवातीच्या काही सामन्यांस पॅट कमिंस मुकणार आहे, त्यामुळे हैदराबाद संघाच्या कर्णधारपदी ईशान किशनची नियुक्ती करण्यात आली आहे, तर अभिषेक शर्मा उपकर्णधार असेल.

ऑस्ट्रेलियन कमिंस पाठीच्या दुखापतीमुळे अनेक महिने क्रिकेटपासून दूर आहे. प्रतिष्ठेच्या ॲशेस मालिकेतही बहुतेक सामन्यांत तो खेळला नाही. टी-२० विश्वकरंडक स्पर्धेतूनही त्याला माघार घ्यावी लागली होती. अजूनही तो पूर्ण बरा झालेला नाही.

दुखापतीतून सावरण्यासाठी कमिंसला अजूनही काही कालावधी लागणार आहे, त्यामुळे तो सुरुवातीच्या सामन्यांत खेळू शकणार नाही, त्याच्याऐवजी आम्ही ईशान किशनची नियुक्ती करत आहोत तर उपकर्णधारपदी अभिषेक शर्माची निवड केली आहे, असे हैदराबाद फ्रँचायझीने सोशल मीडियाद्वारे जाहीर केले.


पॅट कमिंस व ईशान किशन

कमिंस नेमक्या किती सामन्यांत खेळणार नाही, हे मात्र हैदराबाद संघाने स्पष्ट केले नाही. हैदराबाद संघात ऑस्ट्रेलियाचा ट्रॅव्हिस हेड असतानाही ईशान किशनला कर्णधारपदासाठी प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे यंदाच्या आयपीएलमध्ये सुरुवातीला तरी सर्व १० संघांचे कर्णधार भारतीय असणार आहेत. कमिंस हा एकमेव परदेशी कर्णधार होता.

टी-२० विश्वकरंडक स्पर्धेत विजेतेपद मिळवणाऱ्या भारतीय संघातून ईशान किशनने चांगला ठसा उमटवला आहे. १९९.३७ च्या स्ट्राइक रेटने आणि ८०.२५च्या सरासरीने त्याने ३१७ धावा फटकावल्या. या कामगिरीमुळे तो आयसीसी क्रमवारीत फलंदाजीत दुसऱ्या क्रमांकापर्यंत पोहोचला आहे. टी-२० विश्वकरंडकात स्थान मिळण्याअगोदर ईशानने त्याच्या झारखंडचे नेतृत्व करून मुश्ताक अली टी-२० स्पर्धेत विजेतेपद मिळवून दिले होते.

# भारत-पाकिस्तान आमनेसामने

## हॉकी विश्वकरंडक : नेदरलँड्समध्ये सामने

नवी दिल्ली, ता. १८ : यंदा बेल्जियम व नेदरलँड्स येथे होत असलेल्या हॉकी विश्वकरंडकासाठी गटवारी मंगळवारी जाहीर करण्यात आली. नेदरलँड्समधील ॲमस्टरडॅममधील वॅगनेर स्टेडियममध्ये या प्रतिष्ठेच्या स्पर्धेचा ड्रॉ घोषित करण्यात आला. पुरुषांच्या विश्वकरंडकात भारत व पाकिस्तान हे पारंपरिक प्रतिस्पर्धी एकाच गटात आहेत. ड गटामध्ये भारत व पाकिस्तान या देशांचा समावेश असून, या गटामध्ये इंग्लंड व वेल्स या देशांनाही स्थान देण्यात आले आहे.

पुरुष व महिला अशा दोन विभागात हॉकी विश्वकरंडक रंगणार आहे. दोन्ही विभागांमध्ये १६ देशांमध्ये जेतेपदासाठी झुंज लागताना दिसणार आहे. पुरुष विभागातील स्पर्धेसाठी भारत व पाकिस्तान हे दोनही देश ड गटात आहेत. महिला विभागातही भारताला ड गटातच स्थान देण्यात आले आहे. ड गटामध्ये भारतासह चीन, इंग्लंड व दक्षिण आफ्रिका या देशांचा समावेश आहे. दोन्ही विभागातील भारतीय संघांच्या लढती नेदरलँड्स येथे पार पडणार आहेत.

## फास्ट न्यूज

### कोनेरू हंपीचा सहभाग अनिश्चित

नवी दिल्ली : भारताची महिला ग्रँडमास्टर कोनेरू हंपी हिची आव्हानवीरांच्या बुद्धिबळ स्पर्धेतील सहभागाबाबतची अनिश्चितता कायम आहे. आव्हानवीरांची स्पर्धा सायप्रस येथे होत आहे. अमेरिका, इस्राईल व इराण यांच्यामधील युद्धाचे परिणाम पश्चिम आशियाई देशांवर होताना दिसत आहेत. हाच धागा पकडत कोनेरू हंपी हिला सुरक्षिततेची चिंता सतावत होती. आव्हानवीरांच्या बुद्धिबळ स्पर्धेला २८ मार्चपासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेतील विजेता डी. गुकेश (पुरुष विभाग) व जू वेनजून (महिला विभाग) या विश्वविजेत्या खेळाडूंना आव्हान देणार आहे. कोनेरू हंपी हिने समाजमाध्यमावर मत व्यक्त करताना म्हटले, की माझ्या एकटीने सर्व काही बदलेल, असे मला वाटत नाही. आव्हानवीरांच्या स्पर्धेत मी खेळणार की नाही, या विषयापेक्षा माझे व्यक्त होणे अत्यंत गरजेचे आहे. माझ्या मनातील सुरक्षेबाबतची भावना व्यक्त करण्यात आली आहे.

### सब ज्युनियर राज्य कॅरम स्पर्धा मुंबईत

मुंबई : महाराष्ट्र कॅरम संघटनेच्या वतीने व सेंट्रल रेल्वे इन्स्टिट्यूट दादरच्या सहकार्याने २६ मार्चला ५०व्या सब ज्युनियर राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धेचे आयोजन मुंबईतील दादर येथील एम.सी.ए. ट्रेनिंग सेंटर, सेंट्रल रेल्वे इन्स्टिट्यूट दादर येथे करण्यात आले आहे. १२ वर्षांखालील मुले व मुली (कॅडेट) आणि १४ वर्षांखालील मुले व मुली (सब ज्युनियर) अशा एकंदर चार गटांत ही स्पर्धा रंगणार असून विजेत्यांना आकर्षक चषक व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यांतून १२ वर्षांखालील गटात दोन मुले व दोन मुलींना, तर १४ वर्षांखालील गटात सहा मुले व सहा मुलींना प्रवेश देण्यात येणार आहे. या स्पर्धेचे प्रवेश अर्ज महाराष्ट्र कॅरम संघटनेच्या www.maharashtra carromassociation.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**
दूरध्वनी क्र. 2333536-40, 2348001-05
E-mail : contact@aurangabadmahapalika.org, est1@aurangabadmahapalika.org

जा.क्र.मनपा/आस्था-१/२०२६/३७८ दिनांक :- १८/०३/२०२६

**-: पदभरती जाहिरातीबाबत जाहीर प्रगटन :-**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क मधील विविध संवर्गातील सरळसेवेची एकूण २२२ पदे भरण्याबाबत दि. १६/०२/२०२६ रोजी जाहिरात प्रसिध्द केली असून अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. १८/०३/२०२६ पर्यंत आहे.
तथापि, शासनाचे निर्देश व संचालक, महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालिन सेवा संचालनालय, मुंबई यांचे दि. २४/०२/२०२६ रोजीच्या पत्रानुसार अग्निशमन विभागातील उपअग्निशमन केंद्र अधिकारी व अग्निशामक या संवर्गाचे सुधारित सेवा प्रवेश नियमानुसार बदल प्रस्तावित असून सविस्तर शुद्धिपत्रक या महानगरपालिकेच्या वेबसाईटवर लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल.
करिता सर्व पदांसाठी ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची मुदत दि. ३१/०३/२०२६ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

स्वाक्षरित
(रणजीत आ. पाटील)
अतिरिक्त आयुक्त
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**शुद्धिपत्रक**

दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने विविध श्रेणीतील १५२ पदे सरळसेवा भरतीद्वारे भरणा करणेसाठी IBPS ने दिनांक १८-०२-२०२६ रोजी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेतली आहे. सदर परिक्षेचा निकाल यापूर्वीच (www.parbhanidccbank.com) या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आला आहे. परीक्षेच्या माध्यमातून पात्र ठरलेल्या उमेदवारांना आय.बी.पी.एस.ने मुलाखतीसाठी कॉल लेटर प्राप्त करून घेण्याकरीता आवश्यक लिंक वेबसाईटवर (www.parbhanidccbank.com) उपलब्ध करून दिलेली आहे.
सर्व पात्र उमेदवारांनी द्यावयाच्या मुलाखतीच्या तारखेत खालीलप्रमाणे बदल करण्यात आला असून सर्व उमेदवारांनी मुलाखतीसाठीचे कॉल लेटर प्राप्त करून घेवून खालीलप्रमाणे मुलाखतीसाठी निर्धारीत वेळेवर हजर रहावे.

| अ. क्र. | कॉल लेटरप्रमाणे मुलाखतीचा दिनांक | प्रत्यक्षात मुलाखतीचा दिनांक |
|---|---|---|
| १ | दिनांक २०-०३-२०२६ | दिनांक २५-०३-२०२६ सकाळी १०.३० वाजता |
| २ | दिनांक २१-०३-२०२६ | दिनांक २६-०३-२०२६ सकाळी १०.३० वाजता |
| ३ | दिनांक २२-०३-२०२६ | दिनांक २७-०३-२०२६ सकाळी १०.३० वाजता |
| ४ | दिनांक २३-०३-२०२६ | दिनांक २८-०३-२०२६ सकाळी १०.३० वाजता |
| ५ | दिनांक २४-०३-२०२६ | दिनांक २९-०३-२०२६ सकाळी १०.३० वाजता |

स्थळ :- परभणी
दिनांक :- १८-०३-२०२६
स्वाक्षरित
विभाग प्रमुख
प्रशासन

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) यांचे कार्यालय
क्र. कार्य.अभि.यां./५३८१/प्रशितन दि.१८.०३.२०२६

**ई-निविदा सूचना**

विषय- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, कांदीवली (पश्चिम) येथील वातानुकूलन यंत्रणेच्या उच्च दाब बाजूची क्षमता वाढविण्याचे काम.
कार्य.अभि.यां./प्रशि/T-८४ दि. ०८.०४.२०२६

| | |
|---|---|
| बोली क्रमांक | 2026_MCGM_1288107_1 |
| बोली सुरू होणारी तारीख व वेळ | १९.०३.२०२६ रोजी स. ११.०० वा. |
| बोली बंद होणारी तारीख व वेळ | ०८.०४.२०२६ रोजी दु. ०४.०० वा. |
| पूर्व बोली बैठक तारिख व वेळ | २७.०३.२०२६ रोजी दु.०३.०० वा. |
| वेबसाईट | http://portal.www.mcgm.gov.in |
| संपर्क अधिकाऱ्यांचे नांव | श्री. अ. के. जांभोरे |
| मोबाईल क्रमांक | ९९३०१२८३८७ |
| ई-मेल | eemechref.me@mcgm.gov.in |

सही/-
PRO/3341/ADV/2025-26 कार्यकारी अभियंता यांत्रिकी (प्रशितन)
जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे डासांचे फावते

**दक्षिण मध्य रेल्वे**
आम्हाला येथे फॉलो करा @SCRailwayindia
एस.सी. रेल्वेच्या निविदा सूचनेचा तपशील आमचे संकेतस्थळ : www.scr.indianrailways.gov.in वर पाहाता येईल

**निविदा सूचना क्र. : C_SG_36_596 दिनांक : १३-०३-२०२६** PUB/2135

भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि वतीने **सीनिअर डिव्हिजनल सिग्नल अँड टेलिकॉम इंजिनिअर, सिकंदराबाद विभाग, दक्षिण मध्य रेल्वे, सिकंदराबाद** हे निविदेच्या **ई-प्रोक्युअरमेंटद्वारे** खालील कामासाठी खुली निविदा मागवित आहेत.

**अ.क्र. १. निविदा क्र. आणि दिनांक : C_SG_36_596, दिनांक : १३-०३-२०२६ बंद होण्याचा दिनांक : ०६-०४-२०२६ कामाचे नाव :** सिकंदराबाद विभागावर टेलिकॉम पायाभूत सेवांचे अद्ययावतीकरण आणि विस्तार.
**१)** सिकंदराबाद विभागावर IT बेस्ड् ॲप्लीकेशनचे (eOffice, ORMS, IPAS, IRWCMS, IREPS, IRPSM, HRMS, SMMS, पॉईंट्स ang क्रॉसिंग इन्स्पेक्शन ॲप इत्यादी) रनिंग आणि बँडविथ सुधारणेसाठी रेलनेट उपकरणे आणि नेटवर्कच्या पायाभूत सुविधांसाठी टेलिकॉम प्रस्ताव. **२)** सिकंदराबाद विभागावरील सर्व कंट्रोल बोर्डससाठी मल्टी मॉनेटर डिस्प्लेची तरतूद आणि डेटा लॉगर प्रणालीचे द्विभाजन. (Servers, CMU's, FEP) **३)** सिकंदराबाद विभाग येथे सिग्नल कंट्रोल रूमचे नुतनीकरण **४)** Sr. DEN/West/SC कार्यक्षेत्रांतर्गत फेज-I च्या पूर्ततेसाठी अ मृत भारत स्थानकांसाठी (VKB & TDU) सिग्नल आणि टेलिकॉम प्रस्ताव. **११)** किमी क्र. ५५/१२-१४ येथे एलसी नं. ०९ (SC-WD विभाग) येथे आरसीसी बॉक्ससह (RUB) एलसीच्या प्रस्तावित बदलण्यासह संबंधितमध्ये सिग्नलिंग व्यवस्था. **(एकूण ११ कामे)**
**अंदाजे किंमत (रु.) :** रु. ६,५४,२०,२७२.४०
**बोली सुरक्षितता/बयाणा रक्कम (रु.) :** रु. ४,७७,१००/-

संबंधित तपशिलासाठी संकेतस्थळ **www.ireps.gov.in** येथे भेट द्या.
**सीनि. डिव्हिजनल सिग्नल अँड टेलिकॉम इंजिनिअर, (Co-ord)**
**A2705 सिकंदराबाद**

**संबंधित निविदा अटी/तपशील आणि निविदा कागदपत्रे डाउनलोडिंगसाठी कृपया संकेतस्थळ https://www.ireps.gov.in किंवा www.scr.indianrailways.gov.in येथे भेट द्या.**

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
पाणी पुरवठा विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका, पाणी पुरवठा विभाग मार्फत मागासवर्गीय निधी अंतर्गत मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत सम्राट नगर, हनुमान नगर पंपिंग स्टेशन येथे जलवाहिनी पंपिंग रूमचे नूतनीकरण करणे. या कामाकरिता ऑनलाईन पध्दतीने ई निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटादारां विरुध्द शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटादारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सूचना व निविदा प्रपत्र अधिकृत संकेतस्थळ www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.२०/०३/२०२६ पासुन दि.२७/०३/२०२६ पर्यंत १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा अधिकृत संकेतस्थळ वर दि.२७/०३/२०२६ रोजी सांयकाळी १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास सदर निविदा दि.३०/०३/२०२६ रोजी सांयकाळी १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पा.पु-मुं. प्र.स/१३३१/२०२५-२६ सही/-
दि:१८.०३.२०२६ कार्यकारी अभियंता
Pls visit our oficial web-site www.thanecity.gov.in ठाणे महानगरपालिका, ठाणे
**मालमत्ता कर वेळेत भरा...कारवाईची अप्रिय घटना टाळा !**

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ**
**ई-निविदा सूचना क्र. :-**
**का. अ. (पूर्व)/मुं. झो.सु.मंडळ/ई-निविदा/११५/२५-२६**

कार्यकारी अभियंता पूर्व विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३६, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५२५१) यांनी योग्य वर्गवारी तथा शासकीय किंवा निमशासकीय नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकूण ०६ कामाकरीता बी-१ (टक्केवारी) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. विस्तृत ई-निविदा सूचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळ http://mahatenders.gov.in, वर उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक २०.०३.२०२६ सकाळी १०.०५ पासून दिनांक २७.०३.२०२६ सायंकाळी ६.१५ पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक/बदल असल्यास फक्त http://mahatenders.gov.in, संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (पूर्व) मुं. झो. सु.मंडळ यांनी राखून ठेवला आहे.

Follow us: @mhadaofficial
सही/-
कार्यकारी अभियंता (पूर्व),
मुं. झो. सु.मंडळ, मुंबई.
CPRO/A/199
म्हाडा-गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्या संस्था

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ**
**ई-निविदा सूचना क्र.:-**
**का. अ. (पूर्व)/मुं. झो.सु.मंडळ/ई-निविदा/११६/२५-२६**

कार्यकारी अभियंता पूर्व विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३६, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५२५१) यांनी योग्य वर्गवारी तथा शासकीय किंवा निमशासकीय नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण ०६ कामाकरीता बी-१ (टक्केवारी) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. विस्तृत ई-निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळ http://mahatenders.gov.in, वर उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक २३.०३.२०२६ सकाळी १०.०५ पासून दिनांक ३०.०३.२०२६ सायंकाळी ६.१५ पर्यंत राहील. निविदा सूचनेबाबत शुध्दिपत्रक/बदल असल्यास फक्त http://mahatenders.gov.in, संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (पूर्व) मुं. झो. सु. मंडळ यांनी राखून ठेवला आहे.

Follow us: @mhadaofficial
सही/-
कार्यकारी अभियंता (पूर्व),
मुं. झो. सु.मंडळ, मुंबई.
CPRO/A/208
म्हाडा-गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्या संस्था

**Mahindra LIFESPACES**
**महिंद्रा लाइफस्पेस डेव्हलपर्स लिमिटेड**
सीआयएन : L45200MH1999PLC118949 दूर. : ०२२-६७४७८६००
ई-मेल आयडी : investor.mldl@mahindra.com
वेबसाइट : www.mahindralifespaces.com
नोंदणीकृत कार्यालय : महिंद्रा टॉवर्स, ४ए, डॉ. जी.एम. भोसले मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०१८.

**कागदोपत्री स्वरूपातील सीक्युरिटीज्‌चे हस्तांतरण आणि डीमटेरियलायझेशनकरिता स्पेशल विन्डो**

भागधारकांना याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, सेबीने त्यांचे परिपत्रक दि. ०२.०७.२०२५ अन्वये दि. ०१ एप्रिल, २०१९ च्या अंतिम तारखेपूर्वी मूलत: दाखल करण्यात आलेले परंतु दस्तावेज/प्रक्रियेतील कमतरता वा अन्य कारणास्तव रद्द झालेले/परत आलेले/दुर्लक्षित राहिलेले हस्तांतरण दस्तावेज पुन्हा दाखल करण्याची सुविधा देण्यासाठी दि. ०७ जुलै, २०२५ ते दि. ०६ जानेवारी, २०२६ या ६ महिन्यांच्या कालावधीकरिता स्पेशल विन्डो खुली केली होती.

यासंदर्भात, आम्ही तुम्हाला सूचित करीत आहोत की सेबी ने त्यांचे परिपत्रक क्र. एचओ/३८/१३/११ (२)२०२६ - एमआयआरएसडी - पीओडी/१३७५०/२०२६, दि. ३० जानेवारी, २०२६ (परिपत्रक) अन्वये दि. ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी विक्री/खरेदी करण्यात आलेल्या कागदोपत्री सीक्युरिटीज्‌चे हस्तांतरण व डीमटेरियलायझेशन सुविधा देण्याकरिता तसेच वरील निर्देशित हस्तांतरण दस्तावेज पुन्हा दाखल करण्याची सुविधा देण्याकरिता दि. ०५ फेब्रुवारी, २०२६ ते दि. ०४ फेब्रुवारी, २०२७ दरम्यान एक वर्ष कालावधीकरिता अन्य स्पेशल विन्डो खुली केली आहे.

सदर विन्डोच्या व्यवहार्यतेसंदर्भातील स्पष्टिकरणाकरिता खालील बाबींची नोंद घ्यावी:

| हस्तांतरण करार अंमलबजावणी दिनांक | दि. ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी हस्तांतरणाकरिता दाखल केले होते का? | मूळ सीक्युरिटी प्रमाणपत्र उपलब्ध आहे का? | विद्यमान विन्डोमध्ये दाखल करण्यास पात्र आहात का? |
|---|---|---|---|
| दि. ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी | नाही (नवीन दाखल करण्यात आली आहे) | होय | √ |
| | होय (यापूर्वी रद्द झाली होती/परत आली होती) | होय | √ |
| | होय | नाही | × |
| | नाही | नाही | × |

पुढे, सदर स्पेशल विन्डोअंतर्गत खालील बाबी विचारात घेतल्या जाणार नाहीत:
- हस्तांतरक व हस्तांतरितींदरम्यान विवाद असलेल्या बाबी.
- ज्या सीक्युरिटीज् गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी (आयईपीएफ)कडे हस्तांतरित झालेल्या आहेत.

**टीप :** सदर कालावधीदरम्यान पुन्हा दाखल कर ण्यात आलेले सर्व शेअर्स हे हस्तांतरण तथा डीमॅट पद्धतीत प्रक्रिया करण्यात येतील अर्थात हस्तांतरणापश्चात ते केवळ डीमटेरियलाइज्ड् (डीमॅट) स्वरूपात वितरीत करण्यात येतील व ते एक वर्षाच्या लॉक इन कालावधीच्या अधीन असतील.

यासंदर्भातील पुढील कोणतीही माहिती/स्पष्टिकरणाकरिता संबंधित भागधारक कंपनी/आरटीए यांना खालील दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधू शकतील :

| महिंद्रा लाइफस्पेस डेव्हलपर्स लिमिटेड | केफिन टेक्नॉलॉजीस लिमिटेड (आरटीए) |
|---|---|
| ४ था मजला, ए विंग, महिंद्रा टॉवर्स, डॉ. जी. एम. भोसले मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०१८. ई-मेल : investor.mldl@mahindra.com संपर्क क्र. : + ९१ २२ ६७४७ ८६००. | युनिट : महिंद्रा लाइफस्पेस डेव्हलपर्स लिमिटेड सेलेनियम बिल्डिंग, टॉवर - बी, प्लॉट क्र. ३१ व ३२, फायनान्शिअल डिस्ट्रिक्ट, नानक्रमगुडा, सेरिलिंगमपल्ली, हैदराबाद, तेलंगणा, भारत - ५०० ०३२. ई-मेल : einward.ris@kfintech.com संपर्क क्र. : १८०० ३०९४ ००१. |

महिंद्रा लाइफस्पेस डेव्हलपर्स लिमिटेड करिता
सही/-
दिनांक : १९ मार्च, २०२६ बिजल परमार
ठिकाण : मुंबई कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी

**डहाणू नगर परिषद**
ता. डहाणू, जि. पालघर
**ई-निविदा सूचना**

जा.क्र.डनप ४३७५/२०२५-२६ दिनांक १८/०३/२०२६

मुख्याधिकारी, डहाणू नगर परिषद, डहाणू नगर परिषदेच्या आरोग्य विभागाकडील खालील कामासाठी शासनाकडील आवश्यक वर्गातील नोंदणीकृत, ठेकेदाराकडून/सेवा पुरवठादाराकडून ई-निविदा मागवीत आहेत. सदर कामाचे नोंदणीकृत फॉर्म https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २७/०३/२०२५ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा फॉर्म किमंत रूपये | इसारा रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | डहाणू नगर परिषद कार्यक्षेत्रामध्ये कचरा मुक्त शहांचे तारांकन मानांकन (GFC), (ODF+/++), स्वच्छ सर्वे क्षण व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत जनजागृती, प्रचार व प्रसार (IEC) शासनाच्या निकषाप्रमाणे करणे. | २०००/- + १८% GST | २०,०००/- |

अटी व शर्ती
१. सदर कामाच्या सविस्तर अटी व शर्ती https://www. mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहणेसाठी उपलब्ध आहे.

सही/
(अक्षय गुडधे)
मुख्याधिकारी
डहाणू नगर परिषद

मुख्य कार्यालय विरार
यशवंत नगर, विरार (प.)
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०३.

दूरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स: ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
जा.क्र.:- व.वि.श.म./शअ/बांध/९१०/२०२६
दिनांक :- १८/३/२०२६

**जाहीर ई-निविदा सुचना करीता प्रथम मुदतवाढ**

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आचोळे सर्व्हे नं. ६ येथे ४०० खाटांचे बहुविशेषज्ञ (Multispeciality) रुग्णालय उभारणे या कामासाठी कंत्राटदार नियुक्त करणेकामी जा.क्र./वविशम/बांध/शअ/८५५/२०२६ दि. २५/०२/२०२६ अन्वयेची ई-निविदा सुचना https://mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर निविदा आयडी क्र. २०२६_VVCMC_१२८१६७९_१ दि.२७/०२/२०२६ रोजी प्रसिध्द करून दि.२७/०२/२०२६ ते दि. २०/०३/२०२६ रोजी स. ११.०० वाजेपर्यंत ऑनलाईन मागविण्यात आली होती. सदर निविदेमधील स्विकृतीची अंतिम तारीख प्रशासकीय कारणास्तव पुढील प्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

मुदवाढीचा तपशील खालील प्रमाणे.
१. ऑनलाईन ई-निविदा स्विकृतीची अंतीम दिनांक :- दि. १०/०४/२०२६ सकाळी ११.०० वाजेपर्यंत
२. ऑनलाईन ई-निविदा उघडण्याची दिनांक :- दि. १५/०४/२०२६ सकाळी ११.०० वाजता.

सही/-
(प्रदीप पाचंगे)
प्र. शहर अभियंता
वसई-विरार शहर महानगरपालिका

महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर १९, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४. ०२२-६९३८५९००
Email ID: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

धारिका क्रमांकः एडीव्ही-०८२५/प्र.क्र.११४/२०२५/जाहिरात दिनांकः १८ मार्च, २०२६
आयोगामार्फत शासनाच्या तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील खाली नमूद संवर्गातील पद भरतीसाठी विहित ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | जाहिरात क्रमांक | विभाग | परीक्षा/संवर्गाचे नाव | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | ००४/२०२६ | बृहन्मुंबई महानगरपालिका | उप वैद्यकिय अधीक्षक, गट-अ, क्षयरोग रुग्णालय समूह, बृहन्मुंबई महानगरपालिका. | ०१ |
| २ | ००५/२०२६ | | उप कार्यकारी आरोग्य अधिकारी, गट-ब, महानगरपालिका सेवा. | ०२ |
| ३ | ००६/२०२६ | गृह विभाग | अतिरिक्त सरकारी अभियोक्ता, गट-अ. | २४४ |
| ४ | ००७/२०२६ | गृह (परिवहन) विभाग | मोटार वाहन अभियोक्ता, गट-अ. | ०६ |
| ५ | ००८/२०२६ | सामान्य प्रशासन विभाग | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी / उप संचालक, गट-अ. | २१ |
| ६ | ००९/२०२६ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | वैद्यकीय अधिकारी, गट-ब. | २९७ |

२. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, प्रवर्गनिहाय तपशील, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, स्पर्धा परीक्षांच्या बाबतीत संबंधित परीक्षा योजना व अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in व https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे तसेच सविस्तर जाहिरातीचे कृपया अवलोकन करावे.
३. ऑनलाईन अर्ज https://mpsconline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक २० मार्च, २०२६ ते दिनांक ०९ एप्रिल, २०२६** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.
४. आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

सं. पां. देशमुख
ठिकाण : नवी मुंबई उप सचिव (जाहिरात), महाराष्ट्र लोकसेवा आयोग.